महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन( अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१४

वाचा-

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१३/६०५५४/१५-क(१)/१२०१९, दिनांक २४ डिसेंबर, २०१३.

प्रस्तावना-

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे. तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकारेता दिनांक ०८ ऑगस्ट,२०१३ पर्यंत अर्ज मागविण्यात

आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ३७०० प्रस्तावांपैकी खालीलप्रमाणे एकूण २२१७ प्रस्तावांना याद्वारे शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | वर्गीकरण | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव | एकूण प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | १८०४ | १३२५ | ३१२९ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ४१३ | १५८ | ५७१ |
| एकूण | | २२१७ | १४८३ | ३७०० |

१.१ नवीन शाळा परवानगी व शाळांचा दर्जावाढ - या सोबतच्या **विवरणपत्र- अ** मध्ये दर्शविलेल्या शाळांना, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन परवानगी देत आहे.

१.२. अपात्र शाळा- नवीन शाळा स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिरित्या कळविण्यात येईल .

२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरुं करण्यास खालीलप्रमाणे परवानगी देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी (Permission)** दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता (Recognition) घेणे** आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील **परिच्छेद (१०)** नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह **संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या विवरणपत्रातील यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,

ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा**- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,

*"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा"* म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२८११२४०१९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.03.01 11:46:12 +05'30'

(रा.ग.गुंजाळ)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

१२.संबंधित प्रशासन अधिकारी, महानगर पालिका/नगर परिषद/नगर पालिका

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

२. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

३. मा. मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

५. निवडनस्ती (एसएम २).

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 276 | पुणे | श्री पांडुरंग ग्रमिण विकास प्रतिष्ठाण, निमगांवसावा, जुन्नर, पुणे | नंदीग्राम इंटरनॅशनल स्कूल, निमगांवसावा, ता.जुन्नर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 277 | पुणे | महारिया चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई | सहयाद्री व्हॅली पब्लिक स्कूल, राजुरी, ता.जुन्नर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 278 | पुणे | मातोश्री मुक्ताई प्रतिष्ठान, सायगांव, ता.खेड, जि.पुणे | शोभना केशव खडके इंग्लिश मिडीयम स्कूल, मोहकल, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 279 | पुणे | विघ्नहर्ता शिक्षण प्रसारक मंडळ, वाळद , ता.खेड, जि.पुणे | मळुदेवी न्यू इंग्लिश स्कूल, वाळद, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 280 | पुणे | दि डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडीया, पुणे | महात्मा फुले पिसोळीज, पद्मावती इंग्लिश प्रायमरी स्कूल, पिसोळी, ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 281 | पुणे | श्री. शेलारमामा मेमोरियल सोसायटी, सिंहगड रोड, पुणे | सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कूल, मेदनकरवाडी, चाकण, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 282 | पुणे | मुक्ताई ज्ञानकला क्रिडा व शैक्षणिक ग्रामविकास प्रतिष्ठान, शेळगांव, ता.इंदापूर, जि.पुणे | डि. एच.सी. प्रायमरी इंग्लिश मिडीयम स्कूल, शेळगांव गट नं.1746, मु.पो. शेळगांव, ता.इंदापूर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 283 | पुणे | अजित फाऊंडेशन लोणीकंद, ता. हवेली जि.पुणे. | माईल स्टोन इंटरनॅशनल स्कूल, लोणीकंद, ता. हवेली जि.पुणे. | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 284 | पुणे | युरो स्कूल एज्युकेशन ट्रस्ट मुबई | युरो स्कूल उंन्ड्री ता.हवेली | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक ICSE (NOC) | इंग्रजी | पात्र |
| 285 | पुणे | युरो स्कूल एज्युकेशन ट्रस्ट संचलित मुबई | युरो स्कूल वाकड,पिंपरी - चिंचवड, पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (NOC) (ICSE) | इंग्रजी | पात्र |
| 286 | अहमदनगर | मुळा एज्युकेशन सोसायटी सोनई ता.नेवासा जि.अहमदनगर | यश ॲकॅडमी इंग्लिश स्कूल उस्थळ दुमाला ता.नेवासा | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 287 | अहमदनगर | मुळा एज्युकेशन सोसायटी सोनई ता.नेवासा जि.अहमदनगर | यश ॲकॅडमी इंग्लिश स्कूल घोडेगाव ता.नेवासा | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |

Pune

Regarding Establishment of New Schools as well as raising the standard of the existing school and give recognition for the year 2014-15 as per the Maharashtra self-financed school (Establishment and Management) Act 2012

Government of Maharashtra
Department of Sports and School Education
Government Resolution No.: SFS1114/Prop No 40/SM-2
Madame Cama Road, Hutama Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032.
Date 26th February 2014.

Read –

1. Government Resolution Sports and School Education. No. NOC-2009/(663/9)/GaShi-1 Dated 20th June 2012.
2. Letter No. ASS/Self-financed/2013/60454/15C(5)/12019, dated 24th December 2013 of the Director of Education (Secondary and Higher Secondary) Maharashtra State Pune.

Introduction : -

The Government of Maharashtra has passed the Maharashtra Self-financed School (Establishment and Management) Act 2012 [Act 1 of 2013], in order to establish new schools on self-financed basis; as also to make provisions for raising the standard of the existing schools running higher primary or Secondary or Higher Secondary classes – as the case may be ; to raise the standard of the existing schools; to invite application for the same and grant permission following the set procedure; and this Act is in force from the academic year 2013-14. Additionally, to allow existing English medium schools desirous of getting affiliated with the Boards like CBSE, ICSE, IB, IGCSE, and CIE etc., and issue them the necessary "No Objection certificates" a procedure is set vide Government Resolution dated 20th June 2012.

Applications were invited, till 08th August 2013, for recognition to start new schools on self-financed basis; to raise the standard of the existing schools for the year 2014-15. The Government was thinking of taking action on deserving proposals after their due scrutiny. Considering all the facts of all the cases the Government has decided as follows: -

Government Resolution:-

1. As per the provisions of the Maharashtra self-financed school (Establishment and Management) Act 2012 [Act 1 of 2013], out of the 3700 proposals received, the Government is recognizing a total of 2217 proposals for the academic year 2014-15; as detailed below.

| Sr. No | Classification | Deserving proposals | Non deserving proposals | Total number of proposals |
|---|---|---|---|---|
| 01 | Proposal for Recognition for new schools | 1804 | 1325 | 3129 |
| 02 | Proposal for raising the standard of the school. | 413 | 158 | 571 |
| Total | | 2217 | 1483 | 3700 |

**1.1 Permission for new schools and raising the standard of schools:** The schools as indicated in the attached annexure "A" are permitted – from the academic year 2014-15 - to start new schools and raise their standard by these present.

**1.2 Ineligible schools:** In case of the proposals for Recognition for new schools or for raising the school standard that are found to be ineligible, the Member Secretary of the concerned district scrutiny Committee will inform the details to the individual applicant.

**2. Terms & Conditions of the Government Recognition / raising the standard of the school.**

**2.1** It is mandatory that the Primary and Higher Secondary schools honour the Right of Children to Free and Compulsory Education (RTE) Act 2009 and fulfill the Rules & Provisions made thereunder.

**2.2** Permission is granted as under to the Management Committees of the eligible schools – when they fulfill the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education (RTE) Act 2009 -

**a.** The Management Committees of those schools which are eligible for establishment of a new school or for raising the standard of the school have to apply for the first recognition to the District Educational Officer of the concerned district within one

month from the beginning of the new academic year.

**b.** In case of the Management Committees who are considered to be eligible by this order, but who do not fulfill the requisite conditions, they shall have to make good for the conditions that are presently not fulfilled and shall start the school within eighteen months from the date of this resolution; failing which this permission shall stand cancelled.

**c.** The Management Committees or the Educational Institutes desirous of affiliating their Institutes to the Boards like CBSE, ICSE, IB, IGCSE, and CIE etc., and whose proposals for Recognition are considered to be eligible by the Government will be required to obtain the necessary recognition for their schools and then they can get the necessary No Objection Certificate (NOC) as per the General Policy of the Government Resolution dated 20th June 2012. Such Institutes shall apply along with the letter of recognition for the No Objection Certificate (NOC) once their schools are duly recognized by the District Educational Officer (Primary) / District Educational Officer (Secondary)/Educational Inspector (Greater Mumbai), as per paragraph 10, of the said resolution. Such an application shall be scrutinized and if the concerned school fulfils the set Terms, Conditions and criteria, then the necessary NOC for affiliation to these Boards will be issued to such Management Committees.

**2.3** The New Schools or the schools considered to be eligible for raising the standard as per the enclosed annexure shall -

(i) Follow the orders and Procedures issued/set by the Government from time to time,

(ii) Abide by all the provisions of the Maharashtra self-financed school (Establishment And Management) Act 2012 [Act 1 of 2013].

**2.4** All the concerned Deputy Directors of Education will be responsible for conveying this Order to all the Management Committees and Educational Institutes involved.

**2.5** The concerned competent authorities shall ensure that the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education (RTE) Act 2009, are fulfilled before issuing the **first recognition** letter.

**2.6** The Educational Institute cannot change the Medium of instruction nor the location of the school (for which the application is made) in future. In case the school is started at a place other than the place for which the permission is granted, this permission shall automatically stand cancelled.

**2.7 U-DISE data -** In order to be able to enter the data in the District wise U-DISE (Unified District Information System of Education) the concerned Management Committee or Institute shall be responsible for registering their school under the separate category ***The Institute recognized under the self-financed principle.*** For all further execution in this regard the Project Director, Maharashtra Primary Education Council Mumbai is appointed as the Nodal Officer. Further, the concerned school shall put up a public sign board carrying the matter "New school recognized under the Self- Financed schools/School recognized under raising the standard of Self- Financed schools" for the information of the general public.

This government resolution is uploaded on the Government of Maharashtra website www.maharashtra.gov.in and its code number is 201402281124019921. This order is issued under the attested digital signature.

Issued in the name of and under the order of the Governor of Maharashtra.

Digitally signed by
Ramchandra Ganpat Gunjal

Under Secretary, Maharashtra Government

c.c. to

1. Commissioner, School Education, Maharashtra Government. Pune
2. All Municipal Commissioners.
3. Chief Officers of all Zilla Parishads.
4. Director General, Directorate of information & Public Relations, Mantarlaya, Mumbai
5. State Project Director, State Council of Primary Education, Mumbai
6. Director of Education (Secondary and Higher secondary), Maharashtra State, Pune
7. Director of Education (Primary), Maharashtra State, Pune

8. All Directors under this Department.
9. All the Divisional Deputy Directors.
10. Educational officers of all the Zilla Parishads (Primary and Secondary).
11. All Education Inspectors (West, North and South) Greater Mumbai.
12. Concerned Administrative officers (Municipal Corporations, Municipal Councils, Municipalities)

Copy forwarded for information to –

1. P.A. to Honorable Minister (School Education)
2. P.A. to Honorable Minster of State (School Education)
3. P.A. to Honorable Chief Secretary (school Education)
4. All Joint Secretaries/Deputy Secretaries (School Education and Sports Department)
5. Selection file (SM2)

| Annexure "A" to the Government Resolution SFS-1114/Pro No 4D/SM-2 dated 26th February 2014 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | District | Institute's Name & Address | Name of the proposed school and place | New School/ raising the standanrd | Type | Medium | Recommendation of the scrutinizing committee and the decision taken after considering the Objections / Suggestions received in that regard |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 276 | Pune | Shri Pandurang Gramin Vikas Pratishthan, Nimgaonsava, Junnar, Pune | Nandigram International School, Nimgaonsava, Tal. Junnar, Pune | New School | Primary | English | Eligible |
| 277 | Pune | Maharia Charitable Trust Mumbai | Sahyadri Valley Public School, Rajuri Tal Junnar Pune | New School | Primary to Higher Secondary | English | Eligible |
| 278 | Pune | Matoshri Muktia Pratishthan, Saigaon Tal Khed, Dist Pune | Shobhana Keshav Khadke English Medium School, Mohkal, Tal Khed, Dist Pune | New School | Primary | English | Eligible |
| 279 | Pune | Vighnharta Shikshan Prasark Mandal, Valad, Taluka Khed Dist Pune | Maludevi New English School, Valad, Taluka Khed, Dist Pune | New School | Primary | English | Eligible |
| 280 | Pune | The depressed Classes Mission Society of India, Pune | Mahatma Phule Pisolis Padmavati English Primary School, Pisoli, Taluka Haveli, Dist Pune | New School | Primary | English | Eligible |
| 281 | Pune | Shri Shelarmama Memorial Society, Sinhgad Road, Pune | Sahyadri English Medium School, Medankarwadi, Chakan, Tal Khed, Dist Pune | New School | Primary to Higher Primary | English | Eligible |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 282 | Pune | MuktaiJnankalakreeda and Shaikshanik Gramvikas Pratishthan Shelgaon, TalukaIndapur, District Pune | DHC Primary English Medium School, Shelgaon, Gat 1746, At & Post Shelgaon, TalukaIndapur, Dist Pune | New School | Primary | English | Eligible |
| 283 | Pune | Ajit Foundation, Lonikand Taluka Haveli, Dist Pune | Milestone International School, Lonikand, Tal Haveli Dist Pune | New School | Primary to Higher Secondary | English | Eligible |
| 284 | Pune | Euro School Education trust | Euro School Undri, Talka Haveli | New School | Primary to Higher Secondary ICSE (NOC) | English | Eligible |
| 285 | Pune | Managed by Euro School Education trust | Euro School Wakad, Pimpari-Chinchwad, Pune | New School | Primary to Higher Secondary (NOC) ICSE | English | Eligible |
| 286 | Ahmednagar | Mula Education Society, Sonai, Tal. Newasa, District Ahmednagar | Yash Academy English School, Usthal Dumala Tal. Newasa | New School | Primary | English | Eligible |
| 287 | Ahmednagar | Mula Education Society, Sonai, Tal. Newasa, District Ahmednagar | Yash Academy English School, Ghodegaon, Tal. Newasa | New School | Primary | English | Eligible |